किंमत [illegible] रुपये • पृष्ठे १०४ ○ मे २०१६ ○ वर्ष ८ वे ○ अंक ५

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



## राष्ट्रवादी दुष्काळग्रस्तांच्या पाठिशी





# डाळिंब व द्राक्ष पिक घेणाऱ्यांनी

## खासदार शरद पवार यांचा शेतकऱ्यांना मोलाचा सल्ला

एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी आपण तीन दिवसांसाठी येथे आलेलो आहोत. मला आनंद आहे की, या परिषदेसाठी बाहेरच्या राज्यातीलही डाळिंब उत्पादक आलेले आहेत. येथील शेतकऱ्यांच्या वतीने मी त्या सर्वांचे स्वागत करीत आहे. जे बाहेरुन येथे आलेले आहेत, त्यांना शेतीच्या क्षेत्रातील महाराष्ट्रातील विशेषत: जळगावमधील जैन हिल्स भागात झालेले परिवर्तन पाहून त्यांच्या मनात हा त्यांचा जळगाव दौरा कायमचा स्मरणात राहील, असा मला ठाम विश्वास आहे.

या ठिकाणी आपण एका महत्त्वाच्या पिकासंबंधी चर्चा करीत आहोत. गेल्या काही वर्षांत माझा एक प्रयत्न होता, की देशात शेतकऱ्यांची पिकवार संघटना झाली पाहिजे आणि त्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने काही मदत करण्याची भूमिका घेतली. द्राक्ष उत्पादक एकत्र आले. त्यांनी 'द्राक्ष बागायतदार उत्पादक संघ' ही एक उत्तम संस्था उभी केली. तुम्ही सगळे डाळिंब उत्पादक एकत्र



जळगाव येथे १६ ते १८ एप्रिल २०१६ या काळात डाळिंब उत्पादक संशोधन संघ आणि जैन इरिगेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय डाळिंब परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शरद पवार यांनी व्यक्त केलेले विचार...

# सोसायटीच्या राजकारणात पडू नये

आलात आणि 'महाराष्ट्र डळिंब उत्पादक संशोधक संघ' स्थापन केला. कोकणात आंब्याचे पिक महत्त्वाचे आहे. त्या ठिकाणी आंबा उत्पादकांच्यासंबंधी संघटना उभी केली. या ठिकाणी मला विष्णूपंत भागवत, डी, के. महाजन, वसंतराव महाजन दिसत आहेत. या सगळ्यांचा सातत्याने आग्रह होता की, केळी उत्पादकांची एक संघटना असली पाहिजे. त्या संबंधीचा प्रयत्न त्यांनी केला आणि ते संघटन उभे केले. विदर्भात संत्रा उत्पादक एकत्र आले आणि संत्रा उत्पादकांचे एक राष्ट्रीय पातळीवर संघटन त्यांनी उभे केले. अशी विविध फळांच्यासंबंधीच्या संशोधनाची काम करणारी व शेतकऱ्यांना त्या संदर्भात मदत करणारी आणि संशोधक व प्रत्यक्ष उत्पादक यांचा समन्वय साधणारी आणि बाजारपेठेच्यासंबंधीच्या प्रश्नात लक्ष घालणाऱ्या अशा विविध संघटना आपण देशात आणि महाराष्ट्रात उभ्या केल्या. त्याच्यात नव्या पिढीतले शेतकरी मोठ्या प्रमाणात लक्ष देत आहेत आणि त्याचा उपयोग गुणवत्तावाढीसाठी




होतोय, बाजारपेठेतील प्रश्न सोडविण्यासाठी होतोय आणि त्याच्यासाठी सहाय्य करुन घेण्यासाठी त्याचा उपयोग होतोय, याचा मला आनंद आहे.

पाणी आणि मर्यादित पाण्याचा उपयोग, मर्यादित पाण्यापासून उत्तम प्रकारची उत्पादने घेण्याच्या संदर्भातल्या पद्धती, फळबागांकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता, त्या फळबागांसाठी टिश्यू कल्चरचा वापर करुन, त्याची सिडलिंग, त्याच्यापासून रोपे तयार करण्याची पद्धती, तयार झालेल्या मालावर प्रक्रिया आणि त्याला देशाची आणि जगाची बाजारपेठ, या सगळ्या क्षेत्रांत भंवरलाल यांना ध्यास होता, त्यांची बांधिलकी होती. आणि ते काम त्यांनी या ठिकाणी आयुष्यभर केले. त्याचा उपयोग देशात आणि देशाच्या बाहेरसुद्धा शेतकऱ्यांना झाला. आणि म्हणून ज्या व्यक्तीला ही दृष्टी होती, त्या व्यक्तीने हे सगळे उभे केले, त्या परिसरात या पद्धतीचे शेतकऱ्यांचे संमेलन होणे, याला एक आगळेवेगळे महत्त्व आहे. जळगावचे महत्त्व त्यामुळेच आहे, एवढेच नव्हे तर, आज महाराष्ट्रापुरता जरी विचार केला तर, महाराष्ट्राची शेती आणि महाराष्ट्रातील पाणी, या दोन्हींचे अधिकार जळगावकरांच्या हातात आहेत.

आज पाण्याचा प्रश्न आपणा सगळ्यांच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा झाला आहे. त्याचा दुष्परिणाम शेतीवर झाला आहे. यासंबंधी काही ना काही केले पाहिजे, अशा प्रकारची अपेक्षा आहे. पाणी हे जपून वापरले पाहिजे. त्याच्या प्रत्येक थेंबाचा वापर केला पाहिजे. महाराष्ट्र पाण्याच्या बाबतीत आधीच कमी आहे. महाराष्ट्राच्या राजकर्त्यांचे पाण्याच्या संबंधीचे धोरण प्राधान्याच्या क्रमांक एक वर असले पाहिजे. मी कधी राजकीय टीका-टिप्पणी करायच्या भानगडीत पडत नाही. सत्तेत कोणी असते, कोणी नसते. सत्ता येते आणि जाते. पण, सामान्य माणसाची बांधिलकी कधी सुटत नाही, ही भूमिका घेऊन काम करणारे आम्ही लोक आहोत. ज्या महाराष्ट्राला पाण्याच्या संदर्भात अत्यंत गरज आहे, त्या महाराष्ट्रात गेल्या वर्षादीड वर्षात पाणी पाटबंधारे प्रकल्प, त्याचे जुने प्रकल्प, या संबंधीची चर्चा खूप होते. पण, गुंतवणूक केली जात नाही, याची मला चिंता वाटते. आणि काल माझ्या वाचनात आले, मला नेमके माहिती नाही की, ती माहिती खरी आहे की, नाही? नाथाभाऊ सांगू शकतील. किंवा पाटबंधारे मंत्री सांगू शकतील.

काल एका वृत्तपत्राने महाराष्ट्रातल्या पाण्याच्या संदर्भात लिखाण केलेले आहे की, गेल्या दीड वर्षांत महाराष्ट्रात एक टक्कासुद्धा इरिगेशन झालेले नाही. हे खरं आहे? दुर्देवाने खरं आहे असे म्हणतात. हे काही चांगले लक्षण नाही. बाकी आपण कुठल्याही गोष्टीत मतभेद



करू. निवडणुकीत आपण एकमेकाविरुद्ध लढू. एकमेकांवर काय टीका-टिप्पणी करायची ती करू. पण, शेतीला पाणी देण्याच्या संबंधी आपल्यात दोन मते नाहीत, आपण एका विचाराने त्या शिवारात पाणी जाईल, या प्रकारची भूमिका घेतली पाहिजे. आणि त्यासाठी जे जे करावे लागेल, ते करण्याचा आग्रह आपल्या सगळ्यांचा सामुदायिकरीत्या असला पाहिजे.


अलिकडच्या काळात महाराष्ट्रात चर्चा हीच होते, की विकासाच्या संदर्भात बॅकलॉग राहिला. माझी नाथाभाऊंना विनंती आहे की, आपण आमच्या वतीने मुख्यमंत्र्यांना सांगा-कुठल्याही विभागाचा बॅकलॉग राहिला असेल तर, जी काही असेल नसेल ती तरतूद त्यासाठी खर्च करा. पण, पैसे खर्च करायचे नाही आणि पाणी एक टक्काही वाढवून द्यायचे नाही, हे महाराष्ट्राला शोभणारे नाही. तुम्हाला विदर्भात खर्च करायचे आहेत, अवश्य करा. आम्ही काही वेगळे मानत नाही. आज खान्देशात काय परिस्थिती आहे, हे मी सांगण्याची आवश्यकता नाही. जुना इतिहास मला माहिती आहे. तुमच्यापैकी काहींना माहिती नसेल, एके काळी या राज्यामध्ये स. गो. बर्वे नावाचे अर्थखात्याचे मंत्री होते. जुने आय.सी.एस. होते. उत्तम प्रशासक म्हणून त्यांचा लौकीक होता. त्या वेळच्या सरकारने त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या पाण्याचा वापर कसा करावा? या संबंधी सविस्तर अभ्यास करण्यासाठी व धोरण ठरविण्याचे काम त्यांच्यावर सुपूर्द करण्यात आले होते. आणि त्या स. गो. बर्वे कमिटीने १९६० मध्ये अहवाल दिला. आणि त्याच्यात





स्वच्छ सांगितले की, आज या महाराष्ट्रात पाण्याच्या प्रश्नात जर बारकाईने लक्ष द्यायचे असेल तर, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र या परिसरात अधिक लक्ष देण्याची गरज आहे. आणि हे जर लक्ष दिले नाही तर, आज ना उद्या या सगळ्या परिसरात आत्महत्या व भूकबळीचे चित्र बघायला मिळेल. आज आपल्याला मराठवाड्यात काय दिसतेय? पाणी दिसतच नाही. आज तुम्ही टेलिव्हिजन लावला की, पाण्याच्या प्रश्नासंबंधी चर्चा होताना दिसते. आणि तीच अवस्था या भागातसुद्धा आहे. हा नंदुरबारचा परिसर असेल. या जळगाव जिल्ह्याच्या काही भागात पाणी आहे. पण, पाचोऱ्यापासून खाली गेल्यावर काय दिसते? वेगळी परिस्थिती नाही. म्हणून या प्रश्नात आपण अधिक लक्ष देण्याची गरज आहे. मी नाथाभाऊंना एवढेच सांगू इच्छितो, या बाबतीत जे काही सहकार्य लागेल ते सगळे सहकार्य करायला आम्ही तयार आहोत. पण, आपण या राज्यातील शेतकऱ्यांच्या शिवारात पाणी कसे येईल आणि दुष्काळातून त्याची कायमची सुटका कशी होईल, यासाठी जे जे करावे लागेल ते सामुदायिकपणे करण्याची आज नितांत गरज आहे. त्यासाठी आम्हा सगळ्यांची तुम्हाला साथ असेल, हा विश्वास या ठिकाणी देतो.

फळबागाच्या संदर्भात आज आपण एकत्र आलो आहोत. देशाच्या पातळीवर माझा एक आग्रह होता, की सबंध देशाची शेतीच्या संबंधी नियोजनाची एक वेगळी दृष्टी ठेवून काम करण्याची गरज आहे. याचा अर्थ असा आहे, पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश आणि दक्षिणेतील काही राज्ये या सगळ्यांनी ऊस, केळी या पिकांच्या भानगडीत पडू नये. त्यांनी गहू पिकवावा, त्यांनी तांदूळ पिकवावा, मोठ्या प्रमाणात पिकवावा आणि केंद्र सरकारने त्यांना चांगली किंमत द्यावी. एका वर्षात २-३ पिके कशी घेता येतील, याची खबरदारी त्यांनी घ्यावी. आज सुदैवाने, पंजाब, हरियाणा व पश्चिम उत्तर प्रदेश संपूर्ण देशाची भूकेची गरज भागवतोय, इतके उत्पादन तिथला शेतकरी करतोय. म्हणून त्याला अधिक ताकद दिली पाहिजे. त्याला अधिक





किंमत दिली पाहिजे.

आपण खाली आलो तर, आज मध्य प्रदेश सारखे राज्य आहे. मध्य प्रदेशातला गहू हा उत्तर प्रदेशातल्या गव्हापेक्षा चांगल्या दर्जाचा आहे. त्यामुळे त्यांना दोन पैसे अधिक मिळतात. मग त्या ठिकाणी अधिक लक्ष का घालू नये? खाली आपण महाराष्ट्रात पाऊल टाकले, कर्नाटकात पाऊल टाकले, आंध्रच्या काही भागात पाऊल टाकले की,

## जळगाव देशातल्या शेतकऱ्यांची पंढरी!

**आज आपण या ठिकाणी डाळिंबाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी एकत्र आलेलो आहोत. ती परिषद तुम्ही या ठिकाणी घेतली. माझ्या मते जळगाव आता महाराष्ट्रातल्याच नव्हे तर, देशातल्या शेतकऱ्यांची पंढरी व्हायला लागली आहे. आज या ठिकाणी विविध प्रकारचे शेतीच्या संदर्भातील संशोधन आणि विविध प्रश्नांच्यासंबंधी मार्गदर्शन याचे केंद्र आज जळगाव व्हायला लागले आहे. आणि कदाचित त्या केंद्राची पंढरी म्हणजे 'जैन हिल्स' असे मी म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही. त्या संदर्भातली दृष्टी भवरलाल जैन यांना होती.**

ज्या ठिकाणी पाणी मर्यादित आहे. त्या मर्यादित पाण्याच्या परिसरात फळबागावर आपण अधिक लक्ष टाकले आणि ती देशाची गरज भागविण्याची काळजी आपण येथून घेतली तर, आपण देशाची गरज भागवू शकतो. मर्यादित पाण्यामध्ये दोन पैसे जास्त देणारी पिके आपण या भागात घेऊ शकतो. आणि म्हणून, त्या पद्धतीचे नियोजन केले पाहिजे.

मघाशी सांगण्यात आले, जळगाव जिल्ह्यात महाराष्ट्रातून चांगले शेतकरी येत आहेत, याचा आनंद आहे. इथे आम्हाला खूप काम करायचे आहे. मी त्या वक्त्यांच्या मतांशी सहमत नाही. जळगाव जिल्ह्यातला शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून उत्तम शेती करणारा आहे हे माझ्या पाहण्यात आहे. मी नाथाभाऊंचा भाग बघितला. यावल बघितला. रावेत तालुका बघितला. अनेक लोक असे आहेत की, त्यांनी उत्तम प्रकारची शेती केली आहे. केळीच्या बाबतीत राष्ट्रीय विक्रम केले. व त्या संदर्भातला रस्ता दाखविला आहे. ठीक आहे. भावाच्या बाबतीत कमीजास्त होते. यंदाच्या वर्षी केळी केली, त्याचा मलाही फटका बसला. माझा ७५ टक्के माल ३ रुपयांनी गेला. गेल्या १५ दिवसांत आता दहा रुपये भाव मिळायला लागला आहे. पण, आज उत्तम प्रकारचे काम करण्यात तुम्ही लोक यशस्वी झालेले आहात.

आज आपण डाळिंबाचा आपण विचार करतो आहोत. डाळिंबाचे पिक महाराष्ट्रातल्या काही दुष्काळी भागात घेतले जाते, असा आपला समज आहे आणि काही प्रमाणात तो खरा आहे. मात्र, डाळिंबांना पाणी लागत नाही, ही गोष्ट खरी नाही. डाळिंबालाही पाणी लागते. भरपूर पाणी लागते असे

नाही. पण, डाळिंबाला पाणी लागते. कमी पाण्यात डाळिंबाचे पिक घेण्याचा तुम्ही प्रयत्न केला तर, अनेक प्रकारच्या रोगांना तोंड देण्याचा प्रसंग तुमच्यावर येऊ शकतो.

आज आपल्यापुढे डाळिंबाच्या संदर्भात हा प्रश्न आहे की, चांगला वाण असला पाहिजे. स्थानिक बाजारपेठेत किंमत मिळायला पाहिजे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत माल गेला पाहिजे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील विशिष्ट पद्धतीचे फळ घेण्यासंबंधीची काळजी आपल्याला घेतली पाहिजे. पण, सगळ्यांच्या समोर एका प्रश्नाची सातत्याने चर्चा आहे, ती म्हणजे, रोगाच्या संबंधीची! डाळिंब उत्पादकांमध्ये आज तेल्या रोगाची चर्चा फार मोठ्या प्रमाणात आहे. आणि आपण हेही बघतो की, डाळिंबामध्ये एक तडकण्याच्यासंबंधीची सांगतात की, तेल्यापासून तुम्हाला सुटका करुन घ्यायची असेल तर, तुमचे तुमच्या डाळिंबाच्या प्लॉटवर अधिक लक्ष असण्याची गरज आहे, त्याच्यात तेलाच्या नियंत्रणासाठी कोणताही भाग धरण्याच्यापूर्वी आपल्या बागेत काळजीपूर्वक नांगरट करुन घ्यावी. झाडाच्या बुंध्यातली माती फोडाफोडी करुन सूर्याची अतिनिल किरणे पडण्याची व्यवस्था करुन ते निर्जंतूक होईल, याची काळजी घ्यावी. क्लोरिन वायू निर्वात करणारी उदाहरणार्थ ब्लिचिंग पावडर मातीत मिसळावी. आणि शक्य असल्यास पाण्याचा शिडकावा मारावा व यातून क्लोरिन वायू बाहेर पडेल व जीवाणूंचा नाश होईल. आम्ल जमिनीत निर्माण होणार नाहीत, यासाठी 'टीसीसी'सारखी पावडर वापरावी, अशी माहिती तज्ज्ञ देतात. मला वाटते,



सांगोला येथील प्रगतशील शेतकरी अंकुश पडवळे यांचा शरद पवार सत्कार करताना. शेजारी एकनाथराव खडसे, श्री. जाचक, ना. धों. महानोर, अशोक जैन व गिरीश महाजन

एक प्रवृत्ती आहे. डाळिंबाचे फळ आपण तडकलेले पाहतो. आणि तडकणे म्हणजे हा काही रोग नाही. हा रोग आहे, असा एक समज आहे. पण, माझ्या माहितीप्रमाणे आणि तज्ज्ञांशी चर्चा केल्यानंतर तो एक वनस्पतीशास्त्राप्रमाणे शरीराच्या अनियमीतपणाचा एक भाग आहे. आणि हा अनियमीतपणा कसा घालवला पाहिजे, याच्या संबंधीचा विचार झाला पाहिजे. आपले तज्ज्ञसुद्धा हा विचार करत असतात. त्याची कारणे अनेक आहेत. या तेल्याच्या संबंधी अमूक केले तर, उत्तर येईल, असे सांगतात. मध्यंतरी काही लोकांनी सांगितले की, आम्ही तेल्याला उत्तर देणारी औषधे काढली. लोक त्याच्याकडे धावले. पण, त्याचा फार काही उपयोग झाला नाही, हे नंतर लक्षात आले. आज साधारणत: जाणकारांशी मी ज्या ज्या वेळी चर्चा करतो, तेव्हा लोक मला साधारणत: यावर आपण विचार केला पाहिजे.

तेल्याचा हल्ला टाळायचा असेल तर, फळे जेव्हा परिपक्वतेकडे जातात, त्याच वेळेला फिनापेन किंवा केटर्रिन या सारख्या पावडरीने त्या ठिकाणी फवारणी करावी. आणि शक्य झाल्यास फळासाठी पॉलिथीनच्या पिशव्या वापराव्यात. काही लोक वापरतात, असे माझ्या पाहण्यात आले आहे. त्याचा अनुभव चांगला आहे. प्रश्न अवघड असला तरी त्याला काही उत्तरे आहेत. पण, जेव्हा आपण त्या प्लॉटवर सगळे लक्ष केंद्रीत करण्याची भूमिका आपण घेऊ तेव्हा आपल्याला त्याची उत्तरे मिळतील.

उसाची शेती आणि डाळिंबाची शेती, उसाची शेती व द्राक्षाची शेती याच्यात जमीन अस्मानाचा फरक आहे. उसाची शेती आमच्या सारख्यांच्यासाठी सोयीची शेती आहे.

# पवारसाहेबांच्या धोरणामुळेच कोकणात फळपिक वाढले : एकनाथ खडसे



मला आठवतंय, शरद पवार साहेब जेव्हा या राज्याचे मुख्यमंत्री होते. तेव्हा त्यांनी रोजगार हमी योजनेतून शंभर टक्के फळबाग लागवड, अशी एक योजना घेतली होती. आणि कोकणाचा कॅलिफोर्निया करण्यासारखे अनेक विषय त्यांनी समोर ठेवले होते. त्याचा परिणाम, त्या कालखंडात अत्यंत चांगला झाला आणि कोकणामध्ये फळपीक जे वाढले ते केवळ त्या धोरणामुळे वाढले. रोजगार हमीतून शंभर टक्के अनुदान देऊन फळपिकांची लागवड करणे. राज्य सरकारनेही या वर्षी हाच निर्णय घेतलेला आहे की, 'मनरेगा'च्या माध्यमातून फळबाग लागवडीसाठी शंभर टक्के अनुदान देण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. फळपिकासाठी शंभर टक्के अनुदान देत असताना महाराष्ट्रातील एक लाख हेक्टर जमिनीवर फळपिकांची लागवड झाली पाहिजे, असे आम्ही ठरवले आहे. शेतकऱ्यांनी फळपिक लागवडीसाठी शंभर टक्के अनुदानाच्या योजनेचा लाभ घ्यावा, असे मी आवाहन करतो.

मी नेहमी सांगत असतो, राजकारणाच्या पलिकडे जाऊन शेतीच्या संदर्भात ज्या ज्या वेळी चर्चा येतात, त्या त्या वेळी दोन व्यक्तींच्या नावांचा मी आवर्जून उल्लेख करीत असतो. त्यात पहिले नाव आहे शरद पवार साहेबांचे, की ज्यांनी खरोखरच इतक्या वर्षात महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रास एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जे रोप लावले आहे, त्याचा विस्तार कसा करायचा हा आमचा प्रयत्न आहे. पण, दूरदृष्टी ठेवून त्यांनी घेतलेले निर्णय महाराष्ट्रात आजच्या सरकारला व पुढच्या काळातही प्रेरक ठरतील असा माझा विश्वास आहे. माझे व्यक्तिगत मत असे आहे की, शेतीचा विषय आला की, पवार साहेबांच्या शिवाय अलिकडच्या काळातील शेतीचा इतिहास संपूच शकत नाही. आणि दुसरे नाव आहे भंवरलाल जैन यांचे!



कांडं लावले, पाण्याची व्यवस्था केली, खताची व्यवस्था केली,की, कारखान्याला लागण तारीख मागायची आणि मग बाहेर इतर धंदे करत हिंडायचे. हे ज्याला करायचे त्याने उसाची शेती करावी. पण, ज्याला खरोखर दोन पैसे मिळवायचे आहेत, त्यांनी डाळिंबाची शेती केली पाहिजे, त्याने द्राक्षाची शेती केली पाहिजे. डाळिंब व द्राक्षाची शेती ज्याला करायची असेल त्यांनी गावच्या राजकारणात कधी पडू नये, ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत पडू नये, सोसायटीच्या राजकारणात पडू नये, पडायचे असेल तर, आपल्या शेतामध्ये! उत्पादन अधिक कसे येईल या कामात लक्ष केंद्रीत करावे. मला खात्री आहे, तुमची परिस्थिती बदलायला अनुकुलता याखेरीज दुसरी कोणतीही नाही.

२५।मे२०१६



म्हणून, डाळिंबाचे पिक हे लक्ष केंद्रीत करण्यासंबंधीचे पिक आहे.

मला एका गोष्टीचा आनंद आहे, मी ज्या ज्या वेळी तुमच्या अधिवेशनास जातो, मी ज्या ज्या वेळेस द्राक्ष उत्पादकांच्या अधिवेशनाला जातो, त्या वेळेला शेतीच्या संदर्भात, त्या पिकाच्या संदर्भात इतका सखोल अभ्यास करणारा, नव्या पिढीतला शेतकरी मला दुसरीकडे कोठेही बघायला मिळत नाही आणि त्याचे शंभर टक्के श्रेय तुम्हा सगळ्यांना आहे.

मघाशी या ठिकाणी आपण काही लोकांचा सत्कार केला. त्यातील प्रत्येक व्यक्तीने काहीतरी वेगळे काम करुन दाखविले आहे. उत्तम उत्पादन करुन दाखविले आहे. आता हे उत्तम उत्पादन तुम्ही केले. आता त्या संबंधीचे मार्गदर्शन आपण आजूबाजूच्या गावांनाही केले पाहिजे. आज त्याची गरज आहे, केवळ मी एकटा सुधारून चालणार नाही तर, माझे आजूबाजूचे सहकारी आहेत, जे माझे बांधकरी आहेत, त्यांच्याही शेतीत फरक आहे, हे चित्र त्या ठिकाणी दिसले पाहिजे.

खूप लोक मला सांगतात, मी अमूक काम केले आहे, आमचा प्लॉट बघायला या. प्लॉट बघायला गेल्यावर मला आनंद मिळतो. पण, त्याच्या शेजारच्या प्लॉटमध्ये मर आहे, त्याच्या शेजारच्या प्लॉटमध्ये तेल्या आहे, त्याची फळझाडे सगळी वाळून चाललेली आहेत, हे चित्र बघायला माझ्यासारख्याला कधी आनंद मिळत नाही. म्हणून, माझी विनंती आहे, आपण सगळेजण उत्तम शेती करणारे आहोत. उत्तम उत्पादन घेणारे लोक आहोत. आपण आपल्यासारखे ४-६ लोक दरवर्षी तयार करण्यासंबंधीचे आव्हान स्वीकारले पाहिजे आणि महाराष्ट्राची शेती अर्थव्यवस्था मजबूत बनविण्यासाठी, राज्य सरकार जे काही विधायक धोरणे ठरवायची ते ठरवतील, त्याचा लाभ आपण घेऊ. केंद्र सरकार जी मदत करेल, त्यांचीही मदत घेऊ. पण, निव्वळ सरकारवर अवलंबून न राहता, आपणही परस्परांना साथ देऊन, सहकार्य करुन एक वेगळे चित्र निर्माण करू शकतो, त्या पद्धतीचे काम आपल्याला इथून पुढच्या काळात करायचे आहे आणि या अधिवेशनात तुम्ही होणाऱ्या चर्चेत तुम्ही बारकाईने लक्ष द्या, एवढेच माझा आपल्या सगळ्यांना आग्रह आहे.



आज परदेशात आपण अधिक मार्केट मिळविण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. त्यासाठी क्वॉलिटी चांगली केली पाहिजे, तिथे आपण स्पर्धेला टिकले पाहिजे. आज आपल्याला इराणशी स्पर्धा आहे. आज आपल्याला इराकशी स्पर्धा आहे. आज आपल्याला स्पेनशी स्पर्धा आहे. ही स्पर्धा दोन प्रकारची आहे. एक म्हणजे, उत्पादकता आणि दुसरे


म्हणजे क्वालिटी! आता स्पेनसारखा देश. जगातल्या तीन टक्क्यापेक्षा कमी क्षेत्र त्यांचे डाळिंबाच्यासाठी आहे आणि जगातले ५४ टक्के डाळिंबाचे मार्केट आज स्पेनच्या हातात आहे. जगातले एकूण डाळिंबाचे क्षेत्र आहे, त्यापैकी ६० टक्के क्षेत्र आपले आहे. आणि डाळिंब उत्पादनाचा आपला जगातील वाटा हा दहा टक्क्यापर्यंतही पोहोचला नाही. स्पेनसारखा लहान देश हे करू शकतो तर, आपण का नाही? माझी डाळिंब संघाला ही विनंती आहे की, तुम्ही आपल्या शेती मंत्र्यांच्याबरोबर बसा. त्यांच्यासह एखादे शिष्टमंडळ तयार करा. १५ चांगले शेतकरी घ्या. त्याचा खर्च सरकारने किंवा डाळिंब संघाने करा. आणि त्यांना ५-६ दिवस स्पेनमध्ये पाठवा आणि तेथे हॉटेलात न राहता डाळिंब उत्पादक शेतकऱ्याच्या घरी राहण्याची व्यवस्था करू. असेच शिष्टमंडळ इराणमध्ये पाठवू, इराकमध्ये पाठवू. आणि ज्यांनी याच पिकाची शेती आपल्यापेक्षा उत्तम प्रकारे केलेली आहे, त्यांची कार्य पद्धती समजून घेऊ. त्याचा वापर आपण आपल्या भागात करू आणि आपलेही चित्र या ठिकाणी बदलू. त्याच्या परिणाम होऊन आपण आपले स्थान जगाच्या बाजारपेठेत निर्माण करू शकतो. हे आपल्याला करायचे आहे. आज डाळिंबाच्याबाबतीत भंवरलाल जैन यांना दृष्टी होती. आणि म्हणून त्यांनी प्रक्रिया करण्याच्या बाबतीत लक्ष घातले. आपल्यापुढे काही पर्याय ठेवले. पण, सबंध डाळिंब उत्पादकांचा विचार केल्यानंतर किती टक्के आपला माल प्रक्रियेसाठी जातो? अडीच-तीन टक्क्यांपर्यंतही जात नाही, म्हणून, त्याच्यातसुद्धा आपल्याला दुरुस्ती करावी लागेल.

आपल्यातले जे जाणकार तरुण अभ्यासू आहेत, त्या सगळ्यांना एकत्र बसवून, आपण काही पब्लिक लिमिटेड कंपनी करुन प्रक्रिया करणारी यंत्रणा उभी करू शकतो का? आणि ती उभी करुन त्याच्यात तयार झालेला माल हा देश सोडून जगाच्या बाजारपेठेत पाठवू शकतो का?, त्यातून दोन पैसे अधिक मिळवू शकतो का? याचा विचार केला पाहिजे. या संदर्भात जैन इरिगेशनचे मार्गदर्शन आपल्याला उपयोगी पडणार आहे. म्हणून, उत्पादन वाढवणे, उत्पादकता वाढवणे, प्रक्रिया करणे, देशात व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत

## प्रश्नांवर मूलभूत मार्ग शोधणारे पवारसाहेब हे सर्वेसर्वा पतंगराव कदम



डाळिंबाच्या परिषदेसाठी व इरिगेशनसंदर्भात आमच्या रयत शिक्षण संस्थेत साहेबांच्याबरोबर एक बैठक होती आणि ती झाल्यानंतर, जैन इरिगेशनची प्रयोगशाळा बघण्याची संधी मिळाली. साहेब कुठेही गेले की, सांगतात 'रामरामऽऽ! म्हटले की, तो जत तालुक्यातला, आटपाडी तालुक्यातला.आज आमच्या आटपाडी, जत, कवठे महांकाळ भागात सोन्या-चांदीपेक्षा डाळिंबाची ताकद जास्त झालेली आहे. या डाळिंब परिषदेचे उद्घाटक, ज्यांनी प्रत्येक विषयाचा अत्यंत बारकाईने अभ्यास केलेला आहे, त्याचे जे प्रश्न आहेत त्यावर मार्ग शोधलेले आहेत आणि संरक्षण मंत्रिपदानंतर आवडीने कृषी मंत्रिपद घेणारे, खऱ्या अर्थाने शास्त्रज्ञ, मूलभूत प्रश्न समजून घेणारे, सर्वेसर्वा शरदराव पवार साहेब यांनी आयुष्यभर काम केलेले आहे. पंतप्रधानांचा शपथविधी झाला तेव्हा मी हजर होतो. पवार साहेबांना म्हणालो, तुम्ही संरक्षण, गृह, अर्थ व परराष्ट्र मंत्री झाला. ही चार महत्त्वाची खाती. वास्तविक पाहता प्रत्येक खाते महत्त्वाचे असते. साहेब म्हणाले, मी कृषी घेतोय. हे ऐकून मी नाराज झालो. मी म्हणालो, हायेस्ट लायनीत गेला अन् परत कशाला फिरताय? तेव्हा ते म्हणाले, मी घेतलेले खाते महत्त्वाचे आहे की नाही हे तुला पुढे कळेल. या डाळिंब परिषदेला माझ्या पूर्ण शुभेच्छा!





स्थान निर्माण करणे, ही सगळी आव्हाने आज डाळिंब उत्पादकांसमोर आहेत. त्याच्यासाठी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, एक उत्तम प्रकारचे रोप त्या ठिकाणी मिळाले पाहिजे. मला आनंद आहे, टिश्यूकल्चरच्या माध्यमातून भवरलाल जैन यांनी या ठिकाणी हा जो प्रयत्न यशस्वी केला, आज त्याचा उपयोग प्रत्येकाच्या शिवारात होऊन तेथील चित्र बदलले आपल्याला दिसत आहे. तसे निरोगी अशा प्रकारची रोपेच आपण घेतली पाहिजेत. काळजी घेतली पाहिजे. आणि जे जे करणे शक्य असेल ते सगळे करुन,या सगळ्या क्षेत्रात आम्ही काही तरी वेगळे करतो, हे दाखविण्याची काळजी आपण या ठिकाणी घ्याल, अशी अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करतो.



आज पतंगराव कदम या ठिकाणी आहेत. ते स्वत: दुष्काळी भागातले आहेत. त्यांच्या भागात पाणी नाही. पण, माणसे भारी आहेत. स्वस्थ बसत नाहीत. पाणी नसले तरी कोठूनही पाणी आणण्याची काळजी त्यांनी घेतली. आणि पाणी नसले तरी, कमी पाण्याची शेती करण्याची काळजी आज त्या भागातल्या लोकांनी घेतली आहे. त्यामुळे दुष्काळी भाग असला तरी, फळबागा करण्यात हे लोक यशस्वी झाले आहेत. आपण राज्य सरकारची मदत घेऊ या. केंद्राची मदत घेऊ या. आणि आपले दर एकरी उत्पादन, आपल्या मालाचा दर्जा, बाजारपेठेतील आपले स्थान, फळावरील प्रक्रिया या चार गोष्टीकडे लक्ष देण्यासाठी जे जे करता येईल ते करुया. माझी खात्री आहे, तुमची संघटना तुम्ही बलवान केली, त्यांना साथ दिली तर, माझी खात्री आहे की, याच्यात आपण आणखी पुढे जाऊया. या डाळिंब उत्पादक संघटनेचे सभासद हे डाळिंब उत्पादकांपेक्षा कमी आहेत. माझ्याही लक्षात आले. मीही डाळिंब उत्पादक आहे पण, मीही सभासद नाही. मी आत्ता जाताना सदस्य फी भरतो. इतर जे जे सदस्य नसतील त्यांनी सदस्य व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

# डाळिंबाचे रोगमुक्त रोपटे आपण शेतकऱ्यांना देऊ शकलो तर, उत्पादनात सतत वाढ : अनिल जैन

आज ही परिषद शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांचा मेळ घालण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तसं डाळिंबाचा विचार केला तर, जवळजवळ महाराष्ट्रातच साधारणत: ४ ते ५ हजार कोटी रुपयांचा हा व्यवसाय झालेला आहे. साधारणत: ८० हजार ते १ लाख हेक्टरपर्यंत डाळिंबाचे क्षेत्र आहे. आणि हा दुष्काळ जो आपल्याला वाटतोय, त्या दुष्काळात कोरडवाहू जमिनीत व ज्या जमिनीत निचरा चांगला झालेला नसतो, अशा जमिनीत मूल्यवर्धित पिक म्हणून याकडे पाहिले जाते. आमचे वडील व भाऊ, आज भाऊ नाहीत. भाऊंना जाऊन ५० दिवस झाले आहेत. भाऊ आमच्यातच आहेत. फक्त ते शरीराने नाहीत. आणि भाऊंचा विचार नेहमी हाच होता की, शेतकरी आणि विज्ञान याची सांगड कशी घालावी? ज्या प्रमाणे 'जय जवान, जय किसान' अशी आपल्याकडे म्हण आहे, त्या प्रमाणे 'जय विज्ञान, जय किसान' कसे होईल, याच्यासाठीच आमच्या वडिलांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य वेचले. आणि त्याच्यातनंच आदरणीय पवार साहेबांनी २००७ मध्ये भाऊंना एक सूचना केली की, केळीमध्ये आणि टिश्यू- कल्चरमध्ये आपण एवढे काम केलेले आहे, तर आपण डाळिंबाकडेही बघायला हवे. डाळिंब हे महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाचे पिक आहे. आणि साहेबांची ती सूचना लक्षात घेऊन भाऊंनी आमचा जैवतंत्रज्ञानाचा जो संच आहे, त्याला सांगून, त्याच्यानंतर डाळिंबाचे टिश्यूकल्चर सुरू केले. त्या वेळी तर विचार असा होता, आम्ही दिल्लीतल्या ज्या सरकारी संस्था आहेत, त्यांच्याशी बोललो होतो. तेव्हा डाळिंबाच्या टिश्यू- कल्चरसाठी पिक देता येणार नाही, अशी समस्या त्या वेळी शास्त्रज्ञांची होती. पण, अथक परिश्रम करुन शेवटी ते करण्यात आले. आणि त्याच्यामुळे आज शेतकऱ्यांना डाळिंबाची रोगमुक्त रोपे आपण देऊ शकतो.



आणि महाराष्ट्रात गेल्या ३० वर्षांपासून ठिबक सिंचन आहे. त्याच वेळी कमी पाण्यात जास्तीत जास्त मूल्यवर्धित होऊन शेतकऱ्यांना कसे जास्त उत्पन्न मिळवून देता येईल, यावर गेल्या १० ते २० वर्षांत काम झालेले आहे.

अजूनही अनेक विषय आहेत. तेल्याचा विषय आहे. दुसरेही रोग आहेत आणि त्याच्यावर तज्ज्ञ ऊहापोह करतीलच. त्याच बरोबर उत्पादनक्षमता कशी वाढवता येईल. मला वाटते, महाराष्ट्राची उत्पादनक्षमता ही संपूर्ण भारतापेक्षा कमी आहे. पण, डाळिंबाचे एकूण क्षेत्र जास्त आहे. देशाच्या एकूण ७० टक्के क्षेत्र डाळिंबाचे महाराष्ट्रातच आहे.


ठिबक सिंचन आज शेतीसाठी महत्त्वाचे मानले जाते. जसे खताशिवाय शेती करू नये, बियाणाशिवाय शेती करू नये, त्याचप्रमाणे ठिबक सिंचनाशिवाय शेतीच करू नये. आणि या टिश्यू कल्चर रोपट्यांमुळे जर आपण शेतकऱ्यांना रोगमुक्त रोपटे देऊ शकलो तर, त्याच्यामुळे त्याची सातत्याने वाढ होऊ शकते. पण, हे झाल्यानंतर बाजारपेठेचे पुढे काय? त्यासाठी जैन इरिगेशनने डाळिंब प्रक्रियेचा एक प्रकल्प लावला. आणि ज्या ज्या



२१ मे २०१६

# डाळिंबाच्या टिश्यूकल्चर रोपांना सरकार अनुदान देईन : खडसे

**डाळिंबाची टिश्यूकल्चरची रोपे पहिल्यांदा जळगावच्या जैन इरिगेशनने बनविली. हा प्रयोग अत्यंत यशस्वी झाला. त्यामुळे रोगमुक्त चांगली रोपे शेतकऱ्यांना मिळू शकली. विशेषतः तेल्या रोग्याचा प्रादुर्भाव डाळिंबाच्या पिकावर सर्वत्र झालेला असताना टिश्यूकल्चरची रोपे तयार करून संकटावर मात करण्यात कंपनीने शेतकऱ्यांना मोठा हातभार लावला आहे. डाळिंबाचे टिश्युकल्चरचे एक रोप शेतात येईपर्यंत शेतकऱ्याला २४ ते ३० रुपयांना पडते. या रोपांसाठी सरकारमार्फत अनुदान देण्याचा विचार सकारात्मक पद्धतीने आम्ही निश्चितच करू त्यामुळे हलक्या व कमी दर्जाच्या जमिनीवर हे पीक वाढीस लागून या जमिनीही लागवडीखाली येऊ शकतील. मात्र त्यासाठी कृषी विद्यापीठाने शिफारस करणे आवश्यक आहे. असे राज्याचे कृषी व फलोद्यान मंत्री एकनाथ खडसे यांनी जाहीर केले. तेव्हा शेतकऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून त्यांच्या घोषणाचे स्वागत केले.**



वेळी ते शक्य असेल, त्या त्या वेळी आपण शेतकऱ्यांकडून डाळिंबही विकत घेतो.आणि त्या प्रकल्पात शेतकऱ्यांचा जो माल बाजारात जाऊ शकत नाही, सी आणि डी ग्रेड असते. त्या मालाला आपण बाजारपेठ उपलब्ध करुन दिली आहे. आणि यापुढेही आपण ते करीत राहू. शेतकरी मित्रांनो!, जगभर गेल्या दहा वर्षांत डाळिंबाच्या बाबतीत असा प्रसार झाला आहे की, हे फळ आरोग्यासाठी फार चांगले आहे. आणि त्यामुळे माणसाची भूक वाढू शकते, यामुळे कॅन्सरही कमी होऊ शकतो, असे संशोधनअमेरिकेतल्या अनेक विद्यापीठांनी केला आहे. त्यामुळे आरोग्यासाठी डाळिंबाचा रस घेण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. त्यामुळे आज भारतीय डाळिंबांना मध्यपूर्वदेशात, आखाती देशात मागणी दिवसेंदिवस वाढू लागली आहे. आज डाळिंबाच्या बाबतीत भारताला सर्वाधिक स्पर्धा इराण व नजीकच्या देशांशी आहे. इराण व तुर्कस्थानवर मात करण्यासाठी त्यांच्यापेक्षा जास्त चांगली व्हरायटी जर आपण उत्पादित करू शकलो, त्याचा कलर जर लाल राहू शकला तर, त्या डाळिंबांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जास्त किंमत मिळेल व परिणामी शेतकऱ्यांचा फायदा होईल. माझी अपेक्षा अशी आहे, आपण सगळे इथे आला आहात आणि हा संवाद तज्ज्ञ आणि आपल्यात साधला जात आहे, त्यातून आपली डाळिंबावरील अर्थव्यवस्था जी ४-५ हजार कोटी आहे ती १० ते १२ कोटीपर्यंत आगामी पाच वर्षांत कशी नेता येईल, यावर अधिक लक्ष केंद्रीत केले पाहिजे. आपण इतक्या मोठ्या संख्येने आला,त्यावरुन डाळिंब किती महत्त्वाचे पिक आहे, हे यातून दिसून येते. अशी अपेक्षा बाळगून आपले स्वागत करीत आहे.



gn. No. : MH/MR/South-283/2014-16
1 15th of every month posted on 15th, 16th & 17th of every month at Mumbai Patrika Channel Sorting Office Mumbai 400001. RNI No. : MAHMAR / 2008 / 39849


# पेप्सी*, नॉन आयएसआय* म्हणा किंवा बिगर बिलाची ड्रिपलाईन यांचा नादच खुळा

## भले भले, जिगरबाजही जिथे फसले तिथे
## कोंडीबासारखा भोळा शेतकरीही फसला, यात नवल ते कसले?

दिसायला डिट्टो, काळ्या रंगाच्या, दोन पिवळ्या पट्ट्यासुद्धा असलेल्या, मात्र कमी किमतीत घेतलेल्या अश्या ड्रिपलाईनची कारंजी उडायला लागल्याने काही फसले.

गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश व तेलंगणा येथून स्वस्त माल आणून देतो, या लोभामुळे बिगर बिलाचा, चोरीचा माल गळी उतरवला गेला, म्हणून फसले.

जुने घेवून या, फरक द्या व नवीन ड्रिपलाईन घेवून जा, ही तडजोड केली, त्यामुळे फसले.

स्वस्त म्हणून इथून-तिथून माल घेतल्याने हाती कार्यक्षम सिस्टीम येण्यापेक्षा, कडबोळं आलं, त्यामुळेही फसले.

मालाचा दर्जा, कार्यक्षमता, गुणवत्ता व आयुष्य हे विचारात न घेता, निव्वळ सुरवातीची गुंतवणुक लक्षात ठेवून माल विकत घेतला व दोन पैसे वाचविण्याच्या प्रयत्नात पुर्णतः फसले.

अहो! स्वतःच्या फायद्याचा विचार करा, मोह सोडा म्हणजे होणारा त्रागा व फसवणुकीपासून कायमची सुटका.

आपण खर्च करीत असलेल्या पैश्यांचा पुरेपूर मोबदला मिळण्यासाठी जैन ठिबकशी नाते जोडा.

जर शेतीत क्रांती हवी, अधिक उत्पन्न मिळावं असं वाटत असल्यास आम्हाला लिहा, भेटा, चर्चा करा. अनुभवाचं म्हणाल तर आमच्यापेक्षा आमच्याबद्दल जास्त चार जाणकारांनाच विचारावं हे खरं!

अत्याधुनिक तंत्रज्ञान, अद्ययावत डिझाइन्स, दर्जेदार माल, उच्च गुणवत्ता, उत्पादनाची भव्य मालिका, एकाच छताखाली संपूर्ण ठिबक संच, वितरकांचे जाळे, तज्ञांचे मार्गदर्शन, विक्री पश्चात सेवा, गेल्या २९ वर्षात, ७२,००,००० एकराहून अधिक क्षेत्रावर शेतक-यांनी तावून सुलाखून घेतलेलं सोनं, म्हणा की सूक्ष्म सिंचनात अथ पासून इति पर्यंत सर्व...
हे सारे कोणाकडे?



जैन ठिबक®
अस्सल माल, अस्सल माणसं!


जैन टर्बो एक्सेल प्लस


जैन टर्बोलाईन


जैन टर्बो स्लिम


जैन टर्बोलाईन पी.सी.


जैन टर्बो कॅस्केड पी.सी., पी.सी.ए.एस. आणि पी.सी.एन.एल.


जैन टर्बो टॉप पी.सी. आणि पी.सी.ए.एस.



जैन टर्बो टेप

* दिसायला चांगली, मात्र हलक्या दर्जाची आणि अपेक्षित मोबदला न देणारी ठिबक नळी.

दूरध्वनीः ०२५७-२२५८०११; टोल फ्रीः १८०० ५९९ ५०००, फॅक्सः ०२५७-२२५८१११; ई-मेलः jisl@jains.com; इंटरनेटः www.jains.com